Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
DOI link - https://doi.org/10.69758/GIMRJ/2503I3IIVXIIIP0059

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on
Cyber Crime and Social Media
Issue–III(II), Volume–XIII

# सायबर गुन्ह्याची समस्या व आव्हाने

परमानंद उके (सहाय्यक प्राध्यापक)
डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा
मो. नं. ८६००८१७५५६
Mail ID : pbukey10@gmail.com

**गोषावारा**

आजच्या युगामध्ये संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला असून डीजीटल व्यवहाराचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे लोकांना आर्थिक व्यवहार कॅशलेश पद्धतीने करणे सुलभ झाले. डीजीटल प्रगतीमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनातील इतर भौतिक सुखसोयींची व्यवस्था सुलभ झाली. परंतु त्याच बरोबर सायबर गुन्हेगारीचे प्रमाणही तेवढ्याच प्रमाणात वाढले. सायबर गुन्हेगारी ही केवळ आर्थिक व्यवहारापूरती मर्यादित नाही. त्याचे प्रमाण हेरगीरी, महत्त्वाची माहीती हॅक करणे, सुरक्षा भेदने, सोशल मिडीयासारख्या माध्यमातून बदनामी व ब्लॅकमेल करणे इत्यादी बाबतीत सुद्धा गुन्हेगारीचे प्रामाण वाढत आहे. वाढत्या सायबर गुन्हेगारीमुळे आजच्या घडीला शहरी व ग्रामीण भागात याची झळ पोहचल्याचे दिसून येते. सायबर गुन्ह्यामुळे केवळ एक व्यक्ती नव्हे तर उद्योग, सरकारी कार्यालय, सुरक्षा यंत्रणा, बॅंका यांना गंभीर धोका निर्माण झालेला आहे. या संशोधन कार्यात प्रामुख्याने सायबर गुन्ह्याच्या संदर्भात समुदायामध्ये सुधारणा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची गरज व त्याचा सायबर गुन्ह्यावर होणारा परिणाम या संदर्भातील कारणमिमांसेचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्यावरून असे दिसून येते की, समुदायामध्ये सायबर जागृतीची मोठ्या प्रमाणात गरज असून सायबर गुन्हे संदर्भात प्रतिबंधक उपाययोजना म्हणून गायी समुह, महाविद्यालये, सरकारी व खाजगी कार्यालय येथे विविध उपक्रमाद्वारे सायबर गुन्ह्याची गंभीरता व दक्षता याविषयी कार्यक्रम घेतल्यास सायबर गुन्ह्याचे प्रमाण थांबविण्याकरीता मदत होईल असे निष्कर्ष प्रस्थापित केले आहे.

**बीजशब्द** — सायबर क्राईम, सायबर समस्या, आव्हाने, जागृती

**विषयाची ओळख**

आजच्या या विज्ञान युगात प्रत्येक क्षेत्रामध्ये इंटरनेटचा वापर लहान मुलांपासून तर मोठ्या व्यक्ती, वृद्ध व्यक्तीपर्यंत केला जातो. इंटरनेटच्या वाढत्या फायद्यांमुळे सायबर गुन्हेगारीसारखे अपराधांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. आपला देश हा स्मार्टफोन व इंटरनेच्या वापरात जगात आघाडीचा देश असल्याचे दिसून येते. सोशल नेटवर्कींग, ऑनलाईन गप्पा, आर्थिक देवाणघेवाण माहीतीचे आदान—प्रदान इंटरनेटच्या माध्यमातून सुलभ व चुटकीसरशी केले जातात. जसा जसा इंटरनेटचा वापर वाढत गेला आहे. तसा सायबर क्राईमचा धोका सुद्धा तेवढाच वाढलेला आहे. सर्वसाधारणपणे जेव्हा इंटरनेट आणि संगणकाच्या मदतीने असे कोणतेही कार्य एखादी अपरिचित व्यक्ती किंवा एखादा गट, समुहाद्वारे केले जाते. ज्यामुळे दुसऱ्या व्यक्तीचे आर्थिक, शारीरिक किंवा मानसिक नुकसान होऊ शकते. तेव्हा त्याला सायबर क्राईम म्हणतात. म्हणजेच सायबर क्राईम म्हणजेच संगणक आणि इंटरनेट नेटवर्कचा समावेश असलेला गुन्हा होय असे म्हणता येईल. सायबर क्राईममुळे होणारे नुकसान हे खूप व्यापक असू शकते. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास सामान्य व्यक्तीचे काही रूपयापासून ते देशाच्या सुरक्षेला नुकसान करण्याइतपत असू शकते. याचे लोन केवळ शहरी समुदायापर्यंतच मर्यादित नसून ग्रामीण भागातही हे प्रमाण वाढत आहे. आज प्रत्येक गरीब—श्रीमंत, मध्यमवर्गीय कुटूंबातील लोकांकडे स्मार्टफोन आहे. एकीकडे या तंत्रज्ञानामुळे फायदा होत आहे तर दुसरीकडे याच तंत्रज्ञानाचा काही व्यक्ती गैरवापर करणारे आहेत.

सायबर गुन्हेगारी ही नवनवीन तंत्रज्ञानाच्या शोधाचा एक प्रमुख दुष्परिणाम आहे आणि ही जागतिक समस्या झालेली आहे. अशा गुन्ह्यात मोठ्या संख्येने महिला बळी पडतात. त्यांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे. अशा गुन्ह्याचा सामना करण्यासाठी भारतामध्ये माहिती तंत्रज्ञान कायदा २००० आहे.

**उद्देश**

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
DOI link - https://doi.org/10.69758/GIMRJ/2503I3IIVXIIIP0059

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Cyber Crime and Social Media
Issue–III(II), Volume–XIII

१) सायबर गुन्हेगारीच्या स्वरूपाचे अध्ययन करणे.
२) सायबर गुन्ह्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा आढावा घेणे.

**अध्ययन पद्धती**

सदर अध्ययन कार्यात गुणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. तथ्यांचे संकलन हे प्राथमिक व दुय्यम दोन्ही पद्धतीने केले आहे.

**साहित्य आढावा**

१) **तनवीत कौर (ख्रिस्त विद्यापीठ लवासा पुणे)** यांनी "भारताच्या संदर्भात सायबर गुन्हे आणि सायबर कायद्यांतील विश्लेषण अभ्यास" या संशोधन क्षेत्रात असे नमुद केले आहे की, सायबर गुन्ह्याचा धोका मानवतेसाठी खूपच गंभीर आहे. देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि सुरक्षिततेच्या पैलूसाठी सायबर गुन्ह्यांचा प्रतिबंध आवश्यक आहे. सायबर गुन्ह्यांना तोंड देण्यासाठी भारतात आयटी कायदा २००० मंजूर केलेला आहे. परंतु कायद्याच्या अंमलबजावणी अनेक आव्हाने आहेत. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी योग्य प्रशिक्षण व अतिरिक्त संसाधनाची गरज आहे. कारण कायद्याच्या योग्य अंमलबजावणीमुळेच अर्थव्यवस्थेचा विकास होण्यास आणि मोठ्या प्रमाणात गुन्ह्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होऊ शकेल.

२) **समीर हिंदुजा (फ्लोरिडा अटलांटिक विद्यपीठ) व जस्टीन डब्ल्यू पॅचिन (विस्कान्सिन विद्यापीठ इओ ब्लेअर)** यांनी Caltivation youth yesilience to prevent bullying and cyber bulling victimization (2017) यामध्ये असे नमुद केले की, गुंडगिरी व सायबर बुलींगला रोखण्यासाठी आणि योग्य प्रतिसाद प्राप्त होण्यासाठी शाळा–महाविद्यालयातुन युवकांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन तयार करण्याची गरज आहे. गुंडगिरी व सायबर बुलींगचा अनुभव रोखण्यासाठी आणि त्याचा परिणाम कमी करण्यासाठी लवचिकता हा एक शक्तीशाली संरक्षणात्मक घटक आहे.

३) **फहाद अलेनेझी (शिक्षण मंत्रालय), शहाबुद्दीन बिन हाशीम, मशैल अलानेझी (आरोग्य मंत्रालय कुवैत) (मे २०२४)** यांनी 'किशोरवयीन विद्यार्थ्यांमधील कठोरता आणि सायबर अपराधी यांच्यातील संबंधावर आशावाद आणि साधनसंपत्ती मध्यस्थीचा' प्रभाव या विषयांतर्गत अध्ययन कार्य केले. त्या आपल्या संशोधन लेखात नमुद केले आहे की, माध्यमिक शाळांमध्ये किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या गुन्हेगारी वर्तनांना आकार देण्यात मानसिक लवचिकतेची भूमिका महत्त्वाची आहे. सायबर गुन्हेगारी वर्तनात गुंतलेला किशोरांसाठी आशावाद व साधनसंपत्तीला संरक्षणात्मक घटक म्हणून महत्त्व दिले पाहिजे.

४) **डॉ. किर्ती, डॉ. ज्योतीसिंग (२०२३)** यांनी 'भारतातील सायबर गुन्ह्यांच्या विकसित होत असलेल्या लॅंडस्केपचा शोध घेणे आणि प्रतिबंधासाठीच्या धोरणांचा अभ्यास करणे. या संशोधन लेखात असे नमुद केले आहे की, संभाव्य जोखीम प्रभावीपणे ओळखण्यासाठी आणि कमी करण्यासाठी भारतात प्रचलित असलेल्या सायबर गुन्ह्याच्या विविध प्रकारांना समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी प्रभावी जागरूकता मोहीम शैक्षणिक उपक्रम आणि ऑनलाईन सुरक्षितता आणि सुरक्षिततेसाठी सर्वोत्तम पद्धतीचा प्रसार आवश्यक आहे. तसेच कुशल सायबर सुरक्षा कर्मचारी, व्यावसायिकांची कमतरता दूर करणे ही महत्त्वाची चिंता आहे. तज्ञ व्यक्तींची उणीव भरून काढययासाठी शैक्षणिक संस्था, उद्योग संघटना आणि सरकारी संस्थांमध्ये भागीदारी आवश्यक आहे.

**महितीचे विश्लेषण**

सायबर गुन्ह्यांच्या व्याप्तीला कोणत्याही भौतिक सीमा नाहीत. सायबर गुन्ह्यामुळे व्यक्ती, व्यवसाय आणि सरकारी संस्थांना गंभीर धोका निर्माण होतो आणि त्यामुळे लक्षणीय आर्थिक नुकसान होऊ शकते. प्रतिष्ठा खराब होऊ शकते आणि रेकॉर्ड धोक्यात येवू शकतात. सायबर गुन्ह्याचा धेका वाढतच आहे. ज्यामुळे त्यापासून संरक्षण करण्यासाठी पावले उचलणे पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. सायबर गुन्ह्यामध्ये प्रामुख्याने ईमेल घोटाळे, सोशल मिडीया फसवणूक, बॅंकिंग फसवणूक, ई–कॉमर्स फसवणूक, मालवेअर, रॅन्समनेअर, हेरगिरी, डेटा उल्लंघन, संगणक व्हायरस डीडीओएस हल्ले,

सॉफ्टवेअर वायरसी, फिक्शींग घोटाळे, ओळख चोरी ऑनलाईन छळ, सायबर दहशतवाद इत्यादी घटकांचा समावेश होतो.

सायबर गुन्ह्यांचे प्रकार जसजसे अधिकाअधिक प्रगत होत जातात. तसतसे संबंधीत धमक्या आणि आर्थिक नुकसानीचे प्रमाणही वाढत जाते, एफवीआयच्या अहवालानुसार, हामलॅड सिक्युरिटी विभागाचे सचिव मेयोर कास यांनी २००० मध्ये सायबर गुन्ह्यांशी संबंधीत ४.१ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त नुकसान अधोरित केले. एफवीआयच्या इंटरनेट क्राईम कम्प्लेट सेंटर (आयसीक) विभागाच्या अलिकडच्या अहवालामध्ये २०२१ मध्ये ६.९ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. लोकसत्ता वर्तमानपत्रात (दिनांक ११ डिसेंबर २०२३) रोजी प्रकाशीत बातमीनुसार दरदिवशी १८० पेक्षा जास्त सायबर गुन्हे नोंदविले जात आहेत. सायबर गुन्हेगारीमध्ये लक्षणीय वाढ झाली असून देशात २०२३ मध्ये ६५ हजार ८९३ गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यामध्ये सर्वाधिक गुन्हे आर्थिक फसवणूक आणि ऑनलाईन लैंगिक शोषण केल्याचे आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाने प्रकाशीत केलेल्या आकडेवारीनुसार देशात तेलंगना राज्य पहिल्या क्रमांकावर असून महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे.

महाराष्ट्रात सायबर गुन्हे वाढत असून २०१६ ते ऑक्टोबर २०२४ पर्यंतच्या आर्थिक फसवणूकीच्या अहवालानुसार २०१६ मध्ये २०८५ प्रकरणे नोंदविण्यात आली होती. तर २०२४ मध्ये आक्टोबरपर्यंत ६४५० प्रकरणे नोंदविण्यात आली होती. (झी २४ तास २० फेब्रु. २०२५)

देशात वाढत्या सायबर गुन्ह्यामुळे होणाऱ्या नुकसानीची तीव्रता भयानक पातळीवर पोहचल्याचे स्पष्ट झाले आहे. एप्रील २०२४ ते जानेवारी २०२५ या अवघ्या दहा महिन्यांच्या कालावधीत २४ लाख सायबर गुन्ह्यांची नोंद झाली आहे. या गुन्ह्यापासून सर्वसामान्यांना तब्बल ४२४५ कोटी रूपयांचा फटका बसला आहे.

महाराष्ट्राच्या सायबर गुन्ह्याची आकडेवारी बघीतली तर वर्षभरात महाराष्ट्रात ६४५० सायबर गुन्ह्यांची नोंद झाली आहे. या गुन्ह्यामध्ये एकूण ७६३४ कोटी २५ लाख रूपयांची फसवणूक झाली आहे. मुंबईमध्ये सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले असून २०१८ ते २०२२ या काळात २४३ टक्के ने वाढ झाली आहे. २०२ मध्ये क्रेडीट कार्ड फसवणूकीचे सायबर गुन्हे सर्वाधिक नोंदले गेले आहेत.

सायबर गुन्ह्याचे प्रमाण वाढतच असून त्याचे लोन शहरी ग्रामीण भागात पोहचे आहेत. जून २०२३ मध्ये वर्ध्यातील वर्धा नागरी सहकारी बॅंकेचे खाते हॅक करून १ कोटी २१ लाख १६ हजार रूपये लंपास केले गेले. त्यामध्ये नायजेरीयन नागरिक असलेला व्यक्ती आरोपी होता.

महिला वर्ग सुद्धा मोठ्या प्रमाणात सायबर गुन्ह्याच्या चक्रव्यूहात अडकलेल्या आहेत.

| वर्ष | Cyber Blackmaling | Cyber Pornography | Cyber Stalking / Cyber Bullying | Detamation / Mropharing |
|---|---|---|---|---|
| २०१७ ते २०२२ | ४४० | २२५१ | १४५७ | ५६२ |

स्त्रोत : खाते Crime in India, 2023 NCRB Report, Ministry of Home Affairs

वरील आकडेवारीवरून महिलांच्या संदर्भातील दाहकता लक्षात येते.

## आव्हाने

वरील विश्लेषणाचा विचार केल्यास सायबर गुन्हेगारी ही गंभीर समस्या होत चालली आहे. ज्यामुळे अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. ज्यामध्ये कायद्यांची कमतरता, तंत्रज्ञानामध्ये वेगाने होणरे बदल, सायबर गुन्हेगारी वाढती संख्या, डेटा सुरक्षा, प्रशिक्षीत व तांत्रिक कौशल्य प्राप्त पोलीस अधिकाऱ्यांचा अभाव, जागरूकतेचा अभाव, सायबर गुन्ह्यासंदर्भात दुर्लक्षीतवृत्ती व बेजबाबदारपणा ही प्रमुख आव्हाने आज देशासमोर असल्याचे दिसून येतात. सर्वसामान्य लोकांना सायबर गुन्हेगारीबद्दल पुरेसे ज्ञान नाही. त्यामुळे सायबर क्राईमला बळी पडण्याची शक्यता जास्त आहे.

## प्रमुख शोध

१) अज्ञान व जागृतीच्या अभावी सर्वसामान्य नागरिक सायबर गुन्ह्याला बळी पडतात.
२) आर्थिक, लैंगिक बदनामी या बाबतीत सायबर गुन्ह्याचे प्रमाण वाढत आहे.
३) सायबर गुन्ह्यांच्या शोधाकरीता यंत्रणा अपुरी पडते.

**निष्कर्ष**

इंटरनेट वापराच्या प्रमाणात सायबर गुन्हेगारी त्याच प्रमाणात वाढत आहे. सायबर क्राईमची समस्या निर्माण होण्यामागील काही प्रमाणात मानवी चूका कारणीभूत ठरत आहेत. तसेच सायबर क्राईम संदर्भात लोकांमध्ये गांभीर्य दिसून येत नाही. जाणीव जागृतीचा अभाव जाणवतो. सायबर क्राईमच्या प्रतिबंधाकरीता शासकीय स्तरावरील प्रभावी उपाययोजना केल्याचे दिसून येत नाही.

**संदर्भ सूची**

१) Gobid Bhattcharjee (2021)- Issue and challenges of Cyber Crime in India-An Ethical Prespective (ISCRT Journal)
२) https:/www.mospi.gov.in/cyber-crimes
३) https://theamikusqriae.com/an-analytical-study-on-cyber-crimes-and-cyber-laws-in-indian-context/
४) https://www.researchgate.net/publication/320042836_Cultivating_youth_resilience_to_prevent_bullying_and_cyberbullying_victimization
५) https://www.ijraset.com/research-paper/exploring-the-evolving-landscape-of-cybercrime
६) https://www.marathisocial.com/cyber-crime-essay-in-marathi/
७) https://mr.m.wikipedia.org/
८) https://www.proofpoint.com/au/threat-reference/cyber-crime
९) https://finlawassociates.com/blog/cyber-crime-punishment-in-india-understanding-laws-penalties-and-legal-recourse/
१०) https://zeenews.india.com/marathi/maharashtra/cyber-%E2%80%8B%E2%80%8Bcrime-in-maharashtra-has-increased-threefold-in-the-last-few-years/887112
११) https://www.loksatta.com/nagpur/maharashtra-ranks-fourth-in-cyber-crime-in-the-country-adk-83-css-98-4093426/
१२) https://www.mahamtb.com/Encyc/2025/3/21/Cyber-scam-losses-reached-to-4245-crores.html
१३) https://prahaar.in/2023/06/16/cyber-crime-five-accused-arrested-in-wardha-civil-cooperative-bank-cyber-attack/